वर्ष ४२
अंक १२

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

BMM बृहन्महाराष्ट्र मंडळ
॥ मराठी तितुका मेळवावा ॥

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

On the web
www.bmmonline.org

समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक डिसेंबर २०२२

## अध्यक्षीय

नमस्कार मित्रमैत्रिणींनो,



अमेरिकेत आता हळूहळू घरांवर रोषणाई दिसायला लागली आहे. ख्रिसमस व आगामी नववर्षाच्या स्वागताचे वारे वाहत आहेत. आमच्या घरी गणपतीसाठी जी रोषणाई होते ती थेट नवीन वर्षापर्यंत चालू असते. गणपतीनंतर आता सर्व मंडळांचे दिवाळीचे कार्यक्रम धूमधडाक्यात पार पडले. सगळे फोटो, व्हिडिओ बघून खूप मस्त वाटलं. थँक्सगिव्हिंग सणालाही सहपरिवार तुम्ही वेळ मजेत घालवलेला असणारच आहे.

या काळात BMM 2.0 या संकल्पनेवर आधारित अनेक नवनवीन उपक्रम आम्ही हातात घेतले. खगोलशास्त्र (Astronomy), बागकाम, ध्यान, योग, उत्तररंग, युवा, मराठीशाळा, आधार, औटडोअर्स, फिटनेस, क्रिकेट, पौरोहित्य प्रशिक्षण, काव्य-लेखन प्रशिक्षण, वृत्त संपादक मंडळ, 'रेशीमगाठी'-(विवाह-इच्छुक मराठी व्यक्तींसाठी), Professional's Bconnect, Mainstream engagement, उत्तर अमेरिकेतील प्रादेशिक कलाकारांचे कार्यक्रम, भारतीय कलाकारांचे कार्यक्रम, वारसा, २०२४ च्या बृ.म.मंडळाच्या अधिवेशनासंबंधित सामंजस्य कराराविषयी (Memorandum of Understanding-) महाराष्ट्र मंडळ बे एरियाच्या कार्यकर्त्यांबरोबर चर्चा, हे सर्व व्यापक काम करण्यासाठी पुढे आलेल्या शंभरहून अधिक स्वयंसेवकांची संघटना उभारणी, Initiative participation reporting for मंडळं, आणि System automation.

तर मित्रमैत्रिणींनो, BMM 2.0 - transforming BMM into an inclusive and collaborative organization-चे काम जोमाने चालले आहे. डिसेंबर १८ ला आम्ही पहिली 'टाउन हॉल मीटिंग' घेत आहोत. त्यास नक्की उपस्थित राहा. या तीन महिन्यातील झालेल्या कामाचा आम्ही आढावा घेणार आहोत आणि त्या व्यतिरिक्त बृ. म. मंडळाच्या घटनेत काही आवश्यक बदलांचा प्रस्ताव मांडणार आहोत.

मराठी समाजासाठीच्या Lifestyle-based engagement मधून सगळ्या मंडळांची वाढ हा आमचा प्रयत्न आहे. तुम्ही सगळ्यांनी या प्रकल्पांमध्ये नक्की भाग घ्या आपआपल्या मंडळांचे सदस्यत्व घ्या तसेच बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या वृत्ताचे वर्गणीदार सदस्य व्हा अशी मी नम्र विनंती करतो.

नेहमीप्रमाणे एका श्लोकाने थांबतो:-

ॐ असतो मा सद्गमय।
तमसो मा ज्योतिर्गमय।
मृत्योर्मामृतं गमय ॥
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः – बृहदारण्यकोपनिषद् १.३.२८१
(मला unreal/असत्यातून real/सत्याकडे घेऊन जा ।
मला अंधारातून उजेडाकडे घेऊन जा ।
मला मृत्यतून मोक्षाकडे घेऊन जा ॥
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

सगळ्यांना या हॉलिडे सीझनच्या आणि आगामी नवीन वर्षाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

संदीप दीक्षित

**अध्यक्ष (२०२२-२०२४) बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका**
(Email:- sandeep.dixit@bmmonline.org)

***

## या अंकात

| | पान क्र. |
|---|---|
| - अध्यक्षीय | १ |
| - श्रध्दांजली | २ |
| - बृ.म. मंडळ अधिवेशन, बे एरिया २०२४- वार्ता | ३ |
| - बृ.म. मंडळ प्रकल्प | ४ |
| - A Note About BMM Convention 2022 | |
| - पुस्तक परिचय:- "संजीवनी" | ५ |
| - कविता:- 'तूच तो' | ६ |
| - मराठी विश्वसंमेलन | |
| - लेख:- म्हाताऱ्यांची चढाओढ | |
| - कविता:- 'मार्गदर्शक' | ७ |
| - लेख:- लॉस अँजेलिसमधील बेघर व मुंबईतील झोपडपट्टीवाले | ८ |
| - चित्रयोग– क्रीएटिव मेडिटेशन किट | ९ |
| - कविता:- 'हृदयसूत्र' | |
| - Article:- Being Rational | १० |
| - Business Advertisement | ११ |
| - BMM Projects | १२ |
| - पुरवणी ऑनलाईन :- कविता:- 'फळांची शाळा' | १४ |
| - राशिभविष्य:- डिसेंबर २०२२ (On BMM website) | |

## बृहन्महाराष्ट्र वृत्त

**बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र**
**स्थापना 1981 (शिकागो)**
**संस्थापक**:- कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर
**संपादक:** -विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय
**बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय -संपर्क:-**
**BMM Treasurer -** Rajan S Pednekar
20611 Whitebud CT. Tampa FL 33647
Ph- 813-546-1330 Email- Rajan.Pednekar@bmmonline.org

**वर्गणीचे दर:- Printed Copy: $25/ year**
Subscription payment is accepted online by Paypal at:
https://www.bmmonline.org/vrutta/subscription
**जाहिरातींचे दर**
पूर्ण पान: $175 अर्धे पान: $ 100
पाव पान: $ 70 अष्टमांश पान: $ 50

वृत्त दर महिन्यास प्रसिध्द होते. आदल्या महिन्याच्या **२० तारखेपर्यंत** हाती आलेल्या मजकुरातून **निवडक** मजकूर नजिकच्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. मजकूर शक्यतो **युनिकोड मराठीत MS word/Text Fileसह ईमेलने पाठवावा.**
**प्रसिध्द झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही.**
लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.
पाठवलेल्या साहित्याची पोच ईमेल कळविल्यास दिली जाईल.



**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०२२-२०२४)**
**मताधिकार असलेले सदस्य**

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष:-** | संदीप दीक्षित | क्लिवलँड ओहायो |
| **सचिव:-** | अजित नातू | सॅक्रॅमेण्टो, कॅलिफोर्निया |
| **कोषाध्यक्ष:-** | राजन पेडणेकर | टॅम्पा बे, फ्लोरिडा |
| **सदस्य:-** | अमर उन्हेकर | लिव्हिंग्स्टन, न्यू जर्सी |
| | सविता मोरे | सिॲटल, वॉशिंग्टन |
| | मंजुषा नाईक | वेस्ट पाम बीच, फ्लोरिडा |
| | प्रसाद पानवळकर | ऑस्टिन, टेक्सस |
| | विराज राऊत | सॅन होजे, कॅलिफोर्निया |

**नियुक्त सदस्य**
**माजी अध्यक्ष:-** विद्या जोशी, शिकागो, इलिनॉय
**वृत्त संपादक:-** विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय

**विश्वस्त समिती:**

**अध्यक्ष :-** मोहित चिटणीस, सिॲटल, वॉशिंग्टन
**सदस्य** :- नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय
**सदस्य** :- सुनील सूर्यवंशी, रिजफिल्ड, कनेटिकट
...



**प्रकाशक:-** बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका
**संकेतस्थळ:-** https://www.bmmonline.org



Disclaimer: The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.



**अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:-**
vinata.kulkarni@bmmonline.org
Or vinata@gmail.com
Address: 3251 Thunderbird Court (E)
Aurora IL, 60503


# श्रध्दांजली



अमेरिकेतील प्रसिद्ध **कथ्थक नर्तिका अंजनी आंबेगावकर** यांचे लॉस अँजेलिस येथे १२ नोव्हेंबर, २०२२ रोजी, वयाच्या ७५व्या वर्षी निधन झाले.

त्या प्रसिद्ध नर्तक पंडित सुंदरलाल गंगानी यांच्या शिष्या होत्या आणि त्यांनी गुजरात मधील बडोद्याच्या महाराजा सयाजीराव गायकवाड विद्यापीठातून नृत्याची मास्टर्स पदवी संपादन केली होती.

१९६७ साली त्या अमेरिकेत आल्या आणि त्यानंतर लॉस अँजेलिस भागातील उत्तम कथ्थक नर्तिका, नृत्य दिग्दर्शिका आणि नृत्य शिक्षिका म्हणून नावलौकिक मिळवला. त्यांनी स्थापना केलेल्या 'सुंदर कला केंद्र' या नृत्यशाळेने आजतागायत शेकडो कथ्थक नर्तिकांना शिकवले आहे. अमेरिकेतील अनेक विद्यापीठात पाहुण्या व्याख्यात्या म्हणून त्यांना बोलावले गेले. Cirque de Soleil या कंपनीच्या Dralion या कार्यक्रमात त्यांनी प्रमुख नर्तिका म्हणून काम केले होते.

- **मोहन रानडे** (न्यू जर्सी)

***



मराठी रंगभूमी, चित्रपट आणि दूरचित्रवाणी मालिका या माध्यमांद्वारे रसिकांच्या मनावर आपल्या अभिनयाचा वैशिष्ट्यपूर्ण ठसा उमटवलेले तसेच सामाजिक प्रश्नांवर आपली मते स्पष्टपणे मांडणारे **ज्येष्ठ अभिनेते-दिग्दर्शक विक्रम चंद्रकांत गोखले** (वय ७७ वर्षे) यांचे शनिवार दिनांक २६ नोव्हेंबर २०२२ रोजी पुण्यातील खाजगी रुग्णालयात निधन झाले. या संवेदनशील कलाकाराने आपल्या अभिनयातून आजवर सिने, नाट्य क्षेत्रात साकारलेल्या नानाविध भूमिका चिरस्मरणीय ठरल्या.

त्यांच्यामागे पत्नी वृषाली आणि दोन कन्या असा परिवार आहे. ***

# बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन, बे एरिया २०२४- वार्ता

**- भास्कर रानडे** (अध्यक्ष, महाराष्ट्र मंडळ बे एरिया, सॅन होजे कॅलिफोर्निया)



## कला महोत्सव

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या आगामी २०२४ मधे होणाऱ्या अधिवेशनाचे (BMM 2024चे) वारे बे एरियात आधीच जोरदार वाहत आहेत. ती गती आणखी पुढे नेण्यासाठी आणि स्थानिक कलाकारांसाठी सातत्यपूर्ण संधी आणि व्यासपीठ निर्माण करण्यासाठी, 'महाराष्ट्र मंडळ बे एरिया'ने ३० सप्टेंबर ते २ ऑक्टोबर,२०२२ दरम्यान पहिला कला महोत्सव आयोजित केला. अर्थात कला महोत्सवाचे उद्घाटन बृ. म. मंडळाच्या २०२४ मधे होणाऱ्या अधिवेशनाचे प्रमुख संयोजक श्री. प्रकाश भालेराव ह्यांच्या हस्ते झाले. सलग तीन दिवस चाललेल्या, जवळपास ७५ कलाकारांचा समावेश असलेल्या, विविध कलाप्रकारांच्या सादरीकरणाने भरगच्च भरलेल्या या कला महोत्सवाचे शिवधनुष्य 'महाराष्ट्र मंडळ बे एरिया'च्या टीमने अगदी सहजपणे उचलले.




या कला महोत्सवात नाटक, कीर्तन, सुगम संगीत, शास्त्रीय संगीत आणि नृत्य अशा वेगवेगळ्या कलांचा समावेश करण्यात आला होता. श्री. मुकुंद मराठे, श्रीमती सोनाली फडके, श्रीमती मधुवंती भिडे, श्रीमती शुभांगी साखळकर, श्रीमती स्वाती सावळे, श्रीमती हेमाली गोंधळेकर आणि त्यांच्या समूहाने उत्कृष्ट कामगिरी करून कला महोत्सव अतिशय यशस्वी केला.

कला महोत्सव सर्व वयोगटातील कलाकारांना एकत्र आणून सातत्यपूर्ण संधी निर्माण करेल असा महाराष्ट्र मंडळ बे एरियाचा मानस आहे. पुढील कला महोत्सव २०२३ च्या वसंत ऋतूसाठी करण्याचा बेत आहे आणि त्याचे नियोजनही सुरू झाले आहे. अधिक माहितीसाठी mmbayarea.org ला भेट द्या.

**भोजन व्यवस्थापन**:- "अन्न हे पूर्णब्रह्म" हे खरं करण्यासाठी बे एरियाचा चमू उत्साहाने नाविन्यपूर्ण आणि चविष्ट खाद्यपदार्थांची सूची तयार करण्यात गढून गेला आहे. शंभरहून अधिक स्वयंसेवक आपल्या खानपानाची व्यवस्था करण्यासाठी तत्पर झाले आहेत. सकाळची न्याहारी, दुपारचे आणि रात्रीचे भोजन, मधल्या वेळचे खाणे, चहा-कॉफी तसेच सहभागी कलाकारांच्या जेवणाची व्यवस्था करण्यासाठी काटेकोरपणे नियोजनास सुरुवात झाली आहे. त्यांना डॅलस आणि अटलांटिक सिटी येथे झालेल्या अधिवेशनातील भोजन व्यवस्थापकांकडून सुयोग्य मार्गदर्शन मिळाले आहे. आपल्या सगळ्यांची आम्ही आतुरतेने वाट पाहत आहोत. (अन्नपूर्णा चमू - छायाचित्र - पुढील पानावर)



बृ. म. मंडळ अधिवेशन २०२४- अन्नपूर्णा चमू

## बृ. म. मंडळ प्रकल्प - 'आधार'

Helping Marathi Community of North America, during crisis such as Natural calamities (hurricanes etc), untimely deaths, etc.
For more information, Contact Project Lead - BMM Executive Committee member: **Prasad Panvalkar**
**Phone:-** 512-294-3229
**Email:-** Prasad.Panvalkar@bmmonline.org

## बृ. म. मंडळ प्रकल्प - 'उत्तररंग'

**एकमेकांचे धरुनी हात | सुखशान्तीची शोधू वाट ||**
**चला राहू आनंदात | आयुष्याच्या उत्तररंगात ||**
अधिक माहितीसाठी संपर्क**:-** बृ. म. मं. कार्यकारिणी सदस्य, -उत्तररंग नेतृत्व- **मंजुषा नाईक**
**फोन:-**. 813-842-8563
**ईमेल:-** Manjusha.Naik@bmmonline.org

## BMM 2.0 Mainstream Engagement Project

मराठी माणूस नेहमीच आपल्या समाजाकरता मदत करण्यास अत्यंत तत्पर असतो. आपल्या माहितीतदेखील असे अनेकजण असतील जे, फक्त मराठीच नव्हे तर सर्व अमेरिकन समाजाकरता काम करण्यात पुढे असतात. अशा सगळ्यांचे कौतुक करण्यासाठी व अशा सगळ्यांना एकत्र आणण्यासाठी आपण घेऊन येत आहोत:-
BMM 2.0 Mainstream Engagement.
ज्या कुणालाही बृ.म. मंडळाला broader mainstream American पर्यंत पोहोचवण्याची इच्छा आहे, अशा सगळ्यांनी एकत्र येऊन, दुधात साखर जशी विरघळून दुधाची गोडी वाढवते, तसंच आपल्या सेवेचा, समाजकारणाचा सेतू बांधूयात. यासाठी तुमच्या मंडळातील mainstream समाजकारणात काम करणाऱ्या किंवा तशी इच्छा असणाऱ्या लोकांनी खालील संकेतस्थळावर नावनोंदणी करावी:- **https://bmm2.page.link/mainstream**
अधिक माहितीसाठी संपर्क:-
कार्यकारिणी सदस्य **प्रसाद पानवळकर** (Prasad.Panwalker@bmmonline.org) किंवा
या प्रकल्पाच्या-प्रमुख कार्यकर्त्या **श्वेता चक्रदेव** (Shweta.Chakradeo@bmmonline.org).

## A Note About BMM Convention, 2022

**- Dr. Prabhakar G. Joshi** (Chicago, Illinois)

In the September 2022 issue of BMM Vritta Sudhir Kulkarni has appropriately listed the negative and positive aspects of the last BMM convention of New Jersey. Those should be useful for the BMM convention organizers. Thanks to the editor of BMM Vritta Dr. Vinata Kulkarni for publishing the contents.
I would like to add that the Lost and Found items were nicely taken care off by shri **Amol Purav**. He returned by mail our forgotten cell phone with its charging wire in a well packed box.

***

## पुस्तक परिचय

- **भाग्यश्री बारलिंगे** (मेसा, ॲरिझोना)



### 'संजीवनी' - एक दर्जेदार संकलन

कथा या शब्दात एक दडलेलं आमंत्रण आहे, ऐसपैसपणा आहे, धावत्या आयुष्यात क्षणभर थांबून श्वास घेण्याची मुभा आहे. एक चांगली कथा पार थेट आतपर्यंत पोचून बंद केलेली कवाडं उघडू शकते, तुंबलेल्याचा निचरा करू शकते; अशीच एक 'सल' नावाची कथा तुम्हाला 'संजीवनी' या कथासंग्रहात वाचायला मिळेल. एकविसाव्या शतकातही आलवण घालणाऱ्या स्त्रियांची स्मृती अश्वत्थाम्याच्या जखमेसारखी धगधगते आहे. या स्त्रियांशी आपलं असलेलं नातं न नाकारता त्यांना या कथेतून श्रद्धांजली वाहिली आहे, त्यांच्या उपेक्षेचा सल कमी करण्यासाठी! काळ हे सर्वात उत्तम औषध असेलही पण बुद्धिवादी समाजासाठी कथा ही त्याहीपेक्षा जास्त सामर्थ्यवान आहे. कालौघात गोष्टी मागे पडतात किंवा विस्मृतीच्या कबरीत गाडल्या जातात. पण कथा त्या स्मृतींचे पुनरुज्जीवन करून अशा जखमांवर मलम लावण्याचा प्रयत्न करते. तसेच उत्तम कथेचा दुसरा निकष असा की, या कथेत वाचकाला आपले प्रतिबिंब दिसते, सभोवतालच्या समाजाचे साक्षेपी चित्रण दिसते. काही कथांचा ('सुटका', 'समुद्रमंथन', 'द्वेषनिशी') कॅनव्हास सातत्याने भारतीय तर काहींचा ('एकटीची वाट', 'ज्वाला व मैत्र', 'डेव्हची गोष्ट') अमेरिकेतील जीवनशैलीवर आधारित आहेत. प्रेमाचा त्रिकोण, लग्न-घटस्फोट, नवरा-बायको मधली कुरबुर हे कथांचे नेहमीचेच विषय असले तरी आजच्या कथेतील स्त्री अगतिक भासत नाही. ('आर या पार', 'सीमारेषा', 'समांतर रेषा', 'कवडसे'). पण समाजाची कितीही उन्नती झाली तरीही काळाच्या कुठल्याही टप्प्यावर स्त्री ही एक विक्रय करण्याची वस्तू समजली जाईल ह्याचं भान राखणारी कथापण वरील कथांच्या पंक्तीत आहे ('स्मृती').


उत्तर अमेरिकेतील कुठलाही कलाप्रकार वर्णद्वेषाच्या उल्लेखाशिवाय पूर्ण होणार नाही. कारण हा विषय आहेच तसा ज्वलंत! याकडे एकता त्रैमासिकाच्या लेखकांनी दुर्लक्ष न करता अंतर्मुख होऊन आपल्या विचारांची छाननी केली आहे. जगाला दोषी न ठरवता आपलं काय चुकतं हे ह्या कथांमधून दाखवताना ('सांबमूर्तीची मुलगी', 'खिडकी') लेखकांची वैचारिक प्रगल्भता जाणवते.

विनोदाची पखरण केल्याशिवाय कुठलाच कथासंग्रह पूर्ण होणार नाही. 'बाहुलीचे लग्न' (बाळबोध मराठी) आणि 'व्हिस्कीचोर' (आधुनिक अमेरिकन आयुष्य) अशा दोन टोकाच्या कथा हास्य-बहार आणतात. 'युध्दस्य कथा रम्या' या सुभाषिताप्रमाणे ('हेर', 'न्याय') या कथा आपली मने रिझवतात आणि आपण या घटनांचा दूरांशानेही भाग नाही, याची सुखद जाणीव करून देतात. अद्भुत कथा लिहिणे हे विनोदी कथा लिहिण्याइतकेच कठीण काम आहे. अशा कथांमुळे कथासंग्रहाच्या व्यक्तिमत्वात भर पडते, एक वेगळे परिमाण त्याला लाभते हे 'समुद्रमंथन' व 'अघटित' या कथांमधून जाणवते.

एखाद्या अनुभवी आणि निष्णात बागकर्मीच्या कौशल्याने डॉ. विद्युल्लेखा अकलूजकर यांनी या कथासंग्रहाचे संपादन केले आहे.

भारतीय संस्कृती, धर्म स्वीकारणारी अमेरिकन व्यक्ती ही आपल्याला हवीहवीशी वाटणारी कल्पना आहे ('अमर प्रेमी'). लग्नाच्या गुंत्यात न पडतादेखील अतिशय गुंतागुंतीचे आयुष्य जगणाऱ्या अमेरिकन लोकांविषयी त्यांच्या आयुष्यात येणाऱ्या अगदी वेगळ्या समस्यांविषयी, प्रेम व माणुसकी यांच्या आधाराने काढलेल्या मार्गाविषयी लिहिणे हे उत्तर अमेरिकेतील लेखकाला कर्तव्यप्राप्त आहे. ज्या समाजात आपण जगतो त्या समाजाची स्मृतिचित्रे ('ऋणानुबंध') रेखाटणे हे त्या समाजाचे ऋण फेडणेच होय. काही कथा ('हक्क निर्मितीचा', 'गोष्ट देण्याची-घेण्याची') जरी एका विशिष्ट कालखंडात आणि विशिष्ट संस्कृतीत घडताना दाखवल्या आहेत तरी त्यातील मर्म, माणसांमधील बंध हे कालातीत आहेत.

या संग्रहातील कथांच्या आवाक्यातून अल्झायमर्स डिसीज व बायपोलर डिसऑर्डर यासारखे विषय सुटलेले नाहीत. 'पहिला पाऊस' ही कथा हृद्य असून सुमित्रा भावे दिग्दर्शित 'अस्तु' सिनेमाची आठवण करून देते. बायपोलर डिसऑर्डरवर लिहिलेली 'तू एक गूढ आहेस' ही कथा वरवर गमतीदार वाटली तरी गांभीर्याने विचार करायला लावणारी आहे. 'दर्शन' या कथेत एकविसाव्या शतकातसुद्धा देवाचे दर्शन व्हावे ही माणसाची एक फार प्राचीन आशा फलद्रुप झालेली दाखवली आहे. 'होणार सून ती 'त्या' घरची' या कथेत धर्मापेक्षा दोन प्रेमिकांमधले बंध महत्त्वाचे हे अधोरेखित केले आहे. त्यातील युक्तिवाद कुणालाही मान्य होईल असा आहे.




एकूण काय तर अतिशय वाचनीय व संग्रहणीय अशा या कथासंग्रहात उत्तर अमेरिकेतील सारस्वताचा खळाळणारा प्रवाह तुम्हाला जाणवेल. या प्रवाहात पुढे विज्ञान कथा, इथल्या राजकारणाच्या कथा, वेगवेगळ्या वंशांच्या लोकांच्या कथा समाविष्ट होतील अशी आशा आहे.

'संजीवनी' - रोहन प्रकाशन, संपादिका- डॉ. विद्युल्लेखा अकलूजकर, पुस्तक खरेदीविषयी अधिक माहितीसाठी संपर्क - vidyut.aklujkar@gmail.com

## तूच तो

-**लंबोदर उर्फ लक्ष्मीकांत बोन्द्रे**
(सॅन अँटोनियो, टेक्सस)



तूच नभातून, ढगांतूनही तूच
तूच या आसमंती, चराचरांतूनही तूच
पवनरूपे वाहसी दाहीदिशांतून तूच
दरवळसी सुमनांच्या गंधकोषांतून तूच
गावागावात, शहराशहरातही तूच
गल्लोगल्ली, आणि घराघरातही तूच
धुंद हवेच्या कणाकणातही तूच
जनाजनांच्या बेधुंद मनातही तूच
रंगहीन, निराकार जरी तूच
कर्णमधुर स्वरसंचार तरी तूच
प्रत्यक्षात आज हरवलास जरी तूच
अंतरात आमुच्या उरलास तरी तूच
आठवांनी तुझ्या भरून येई आज ऊर
देव नाही, दैव नाही ........................
**तूच तो, तूच तो, लताचा सूर**
**तूच तो, तूच तो, लताचा सूर !**

***

## मराठी विश्वसंमेलन
### ४-६ जाने. २०२३, मुंबई

मराठी भाषेचा सर्वांगीण प्रचार-प्रसार वैश्विक स्तरावर होण्यासाठी तसेच सर्वांमध्ये मराठीतून संवाद करण्याची रुची निर्माण करण्यासाठी त्याचप्रमाणे जगभरात मराठीच्या प्रसाराचा वसा घेतलेल्या संस्थांना एकाच छत्राखाली आणण्याठी महाराष्ट्रात प्रथमच मराठी विश्वसंमेलनाचे आयोजन करण्यात येणार आहे. हे विश्वसंमेलन मुंबईत ४ ते ६ जानेवारी, २०२३ रोजी भरणार असून त्यात जगभरातील अनेक मराठीजन सहभागी होणार आहेत.

***

## म्हाताऱ्यांची चढाओढ

- **सुधीर धर्माधिकारी** (सॅन होजे, कॅलिफोर्निया)



आमचं अमेरिकेतलं किचन असूदे नाहीतर भारतातलं, इथे सगळ्यात मनमानी कोणाची असेल, तर भाज्यांची! ह्यांची वेगळीच दादागिरी असते. म्हातारं होण्याची धमकी देतात या! त्यांचं वय इतकं पटापटा वाढत जातं, त्या इतक्या पटापट वाळतात किंवा कुजतात, की त्यांच्या अखेरच्या श्वासाआधी त्यांचं काहीतरी ठरवून, पातेल्यात घालून काहीतरी करावं लागतं. या भाज्या माझं आयुष्य ठरवतात, निदान त्या दिवसासाठी तरी. आज काय खायचं हे मी ठरवत नाही, मरायला टेकलेला पालक ठरवतो, आज तुझा दिवस पातळ भाजी खाण्याचा! तुझी आज जास्तीत जास्त ऐश पालक पनीर पर्यंत. ते सुद्धा घरात पनीर असेल तर. हे तो मला ऐकवतो. या भाज्यांची लवकर म्हातारे कोण होणार याच्यावर चढाओढ असते.

आता बघा ना, ही कोथिंबीर. घरात येते तेव्हा अगदी टीनएजर असते, हिरवीगार, लाजत मुरडत येते. पण जरा ३-४ दिवस झाले, की गेली हिच्या चेहऱ्यावरची लकाकी. मग संपवण्याकरता हीची चटणी करून संपवावी लागते. चटणीबरोबर तिची, मैत्रीण इडलीला आमंत्रण करावं लागतं. चटणी बरोबर प्रणय करायला ब्रेड दोन्ही हाताने तयार असतो, सँडविच होऊन. चटणी पण "मोहे अंग लग जा बालमा" म्हणत त्याच्याबरोबर पसरायला तयार. त्यांचा प्रणय, पण काही दिवसांनी आपल्याला त्याचा कंटाळा येतो. म्हणून "सिलंट्रो पेस्टो" हा चटणी सारखा इटालियन प्रकार शोधून काढला. हा म्हणजे पास्त्याकरता सॉस. त्या दिवशी कोथिंबिरीला एकदम चीज बरोबर एकटं सोडल्यामुळे गोंधळली बिचारी. तर, हल्ली मी हिला पहिल्याच दिवशी मिक्सरच्या छोट्या भांड्यामधे लसणाबरोबर ठेऊन देतो. शेवटच्या क्षणापर्यंत तिला माहिती नसतं तिची डेट आज ब्रेड बरोबर आहे का पास्त्याबरोबर. अशी ही ब्लाइंड डेट!

अवाकाडो हे मेक्सिकन पदार्थांमधलं महत्त्वाचं फळ. हे फळ आहे, पण मेक्सिकन भातात, बरिटोत वगैरे सगळीकडे जातं. हे येताना ४-५ तरी बरोबर येतात. पण गँगस्टर आहेत सगळे, टकले आणि आक्रमक, त्यामुळे मेक्सिकन ड्रग लॉर्ड्स आठवतात, परंतु सगळे एकदम म्हातारे आणि पिचपिचे होतात. गरम डोक्याचे असल्याने त्यांना रेफ्रिजरेटरमध्ये आवडत नाही. एकदम पिकले, की त्या दिवशी कितीही पिठलं भाकरी खायचा मूड असेल तरी यांना शरण जाऊन काहीतरी मेक्सिकन फूड किंवा उगीचच ऑम्लेटवर घाल, सँडविचमध्ये घाल असं करून संपवावं लागतं. हे गँगस्टर्स माझ्या डोक्याला गन लावून "हमरेको बरिटोमें डाल चल, नही तो मर जाऊंगा" म्हणून धमकी देतात.

बटाटे म्हातारे झाले, की कुरूप होऊन घाबरवतात. एक तर यांच्या तोंडावर बरेच डोळे असतात, म्हातारे व्हायला लागले की तेच डोळे मोठे होत जातात किंवा नाकाएव्हढे बाहेर येतात. साध्या भाषेत त्यांना आपण कोंब आले असं म्हणतो. पण या बटाट्यांचं बरंय, निदान भारतीय जेवणात तरी बऱ्याच पदार्थांशी दोस्ती होऊ शकते. मी स्वयंपाकातल्या टूल्स म्हणजे हत्यारांचा बराच हौशी असल्यामुळे, "पोटॅटो रायसर" नावाचा प्रकार आणला, लिंबू पिळण्यासारखंच उकडलेला बटाटा पिळायचा. या म्हाताऱ्यांना उकडून, सालीसकट अर्धं करून याच्यात चेपला, की दुसरी कडून भुगा बाहेर, साल बाजूला. क्षणार्धात म्हाताऱ्यांना जीवनातून मुक्ती! बटाटे संपवण्याची अजून एक

अभारतीय पद्धत म्हणजे "बेक्ड पोटॅटो", ह्याला "उकडलेला बटाटा" म्हणणं म्हणजे बरेच बिल्ले मिळालेल्या एखाद्या मेजर जनरलला हवालदार म्हणण्यासारखं आहे, कारण उकडल्यानंतर बऱ्याच खायच्या दागिन्यांनी हा मढवावा लागतो. जसे मेजरच्या छातीवर मेडल्स असतात तसे. मस्त लागतो.

आपले अगदी घरचेच आणि नेहेमीचे, म्हणजे कांदा, लसूण आणि आलं. या तिघांची म्हातारं होण्याची स्टाईल वेगवेगळी आहे. कांदा न चिरता ठेवला तर तरुण राहतो, पण सोयी करता चिरून ठेवला तर याचं आयुष्यं २-३ दिवसांचं. लसूण, जोपर्यंत त्याच्या नैसर्गिक पांघरुणात आहे, तो पर्यंत जवळ जवळ कधीच म्हातारा होत नाही, पण कष्ट वाचवायला सोललेले लसूण आणले, की काही दिवसातच यांचे केस पांढरे, म्हणजे बुरशी यायला लागते. जगातलं कोणतंही कुझीन घ्या, कांदा आणि लसूण, यांना मागणी असतेच, त्यामुळे यांना सीमारेषेवरच तयार ठेवावं लागतं. आलं, शरीराने बेढब पण मनाने सरळ, म्हातारं व्हायची घाई करत नाही. जाडजूड अनैसर्गिक आलं असेल तर मग कमी टिकतं, लुकड्या भारतीय आल्याचे आयुष्य जास्तं. पण दोघांच्या स्वादामध्ये कमालीचा फरक.

सॅलडची पण कोथिंबिरीसारखीच परिस्थिती, थोडेच दिवस तरुण. अमेरिकन सलाड म्हणजे नुसता पाला. थोडासा म्हातारा व्हायला लागला, की संपवण्यासाठी धडपड करावी लागते. नुकतेच व्हिएतनामीज "राईस रॅप" नावाचा प्रकार शिकलोय याला संपवण्याकरता, म्हणजे तांदुळाच्या पारदर्शक पड्यात सॅलडला गुंडाळून रोल केला, की लवकर संपतो. कोबी (पत्ता कोबी) आणि फ्लॉवर (फुल गोबी) हे मात्रं एकदम खुशालचेंडू सारखे बरेच दिवस तरुण राहतात. कोबीला १५ दिवसांनी जरी विचारलं कसा आहेस, तो म्हणतो "आहे तसाच मस्तं, हिरवा"! भेंडीच्या तारुण्यातही बराच चिकाटीपणा आहे.

मला हे कळत नाही, हे सगळे एकमेकांशी खराब होण्याची स्पर्धा कशाला करतात? आळीपाळीने, एकमेकांशी बोलून म्हातारे व्हा ना! आणि असं पण नाही की, यांचं एकमेकांशी पटतं. हा म्हणतो मी याच्याबरोबर पातेल्यात जाणार नाही, ती म्हणते त्याच्याबरोबर जाणार नाही. एकंदरित यांचं अजिबात 'टीम वर्क' नाही. म्हणून मी एक तोडगा काढलाय. आपापसात न पटणाऱ्या, दोघातिघां भाज्यांना गूगलमध्ये सर्च करून, मी असा प्रकल्प शोधतो, की झक मारत सगळ्यांना एकत्र यावं लागतं. परवाच लक्षात आलं, पालक कंबरेत वाकलाय, राहिलेले उकडलेले छोले पण "उगीचच वय वाढवून ठेवलं आमचं" असं वैगातून म्हणत होते, एक दोन टोमॅटो पण दमछाक करत होते. मग काय तिघांच्या नावांनी मारला गुगल, आली कुठलीतरी मिडल ईस्टर्न का काहीतरी रेसिपी. अंडी तर घरात होतीच. सगळ्यांना एकत्र केलं, सगळे गोंधळले. पण मी खुश. मुलांसमोर डिश सरकवली. मिडल ईस्टर्न- शाकशूखा विथ स्पिनॅच! आता मुलं पण खुश! ***

# मार्गदर्शक

**- प्रिया गोडबोले** (एडिसन, न्यू जर्सी)



यंदा ७ डिसेंबर २०२२ रोजी
दत्तजयंती असून या –
दिनविशेषानिमित्त
श्री दत्तगुरूंच्या स्तुतीपर
खालील कवितेसह
दत्तगुरुचरणी सादर नमन!

माझे अस्तित्व, माझे विचार, माझा विश्वास, आत्मविश्वास
माझे गुण, अंगीभूत, डोकावून नुसते बघत होते
बाहेर येण्यास सारे वारे धजावून अंगातच संचारत होते

जाळ्यापरी कोलाहल मनात अधिकच गुंतत गेला
कोण मी, कशी मी माझ्याचमधे अडकत गेला
माझी बुद्धी, माझी नजर, संशयात मग्न होत गेली
माझ्या गुणांची पोतडी डोकावून नुसतीच बघत बसली

माझे असणे, माझे दिसणे, मीच स्वतः नाकारले
बाह्यरूपातील तेज वगैरे मी सहज स्वीकारले
तेच उच्च, तेच मोठे, नकळत त्यांना मानत गेले
माझे गुण, माझ्या इच्छा, आ वासून बघत बसले

अशावेळी प्रत्येकवेळी कुठूनतरी येउन प्रकाश
गोंधळलेल्या त्या अवस्थेत तोच दाखवी लख्ख आकाश
सांगे, तुझे विचार आहेत नक्कीच वाखाणण्याजोगे
अस्तित्व तुझे, विश्वास तुझा, तुझेच आभाळ सारे

माझी फक्त एक नजर, अंबरभर तारे तुझे
काढ बाहेर नसानसातून ते अंगीभूत गुण तुझे
तुझातल्या पंखांना तूच दे बळ, माझी साथ तुझ्या सवे
कायाकोशातील सारे वारे आता बाहेर वाहू दे

प्रत्येक काट्यासोबतचा, प्रकाशही मागून घे
प्रयत्नांती एक ठिणगी, काजव्यासम तरी उजळू दे
तुझ्यासह आकाशात संतुष्ट मनेही न्हाऊ दे
अहंकाराला दूर ठेवेल असा गुरु तुज लाभू दे !

***

# लॉस अँजेलिस शहरातील बेघर व मुंबईतील झोपडट्टीवाले!

**- सुधीर शं. कुलकर्णी** (लेथम, न्यू यॉर्क)



आम्ही अमेरिकेत राहतो त्या भागात हिवाळा कडक म्हणजे बर्फाळ तसेच तापमान शून्य सेल्सिअसच्याही खाली जाते. अशा हवामानाच्या ठिकाणी आमच्या सारखी वयस्क (म्हातारे म्हणत नाही.) मंडळी हिवाळ्यात गरम हवेच्या फ्लोरिडा सारख्या प्रांतात पलायन करतात. त्यांना 'स्नोबर्ड' म्हणतात. कोव्हिड महामारीच्या साथीच्या आधी दरवर्षी भारतातील मुंबई शहरात मी व पत्नी जानेवारी-फेब्रुवारी महिने काढत होतो. पण मग प्रथम कोव्हिड डेल्टा व नंतर त्याचा चुलत बंधू ओमायक्रोनच्या साथीमुळे तोही दरवाजा बंद झाला. म्हणून कॅलिफोर्नियातील लॉस अँजेलिसमध्ये आम्ही २०२१-२०२२चा हिवाळा काढण्याचे ठरवले. ह्याचे मुख्य कारण म्हणजे आमचा मुलगा व त्याचे कुटुंब त्याच शहरात राहतात. त्याच्या घरापासून १५ मिनिटे चालण्याच्या अंतरावर आम्ही एक अपार्टमेंट घेऊन राहिलो.

इथल्या वास्तव्यात सकाळी चालत जाण्यासाठी व्हेनिस बुलेवार्ड अगदी जवळ होता. ह्या प्रशस्त मार्गाच्या दोन्ही बाजूला रुंद पदपथ असल्याने त्यावर चालणे सोयीस्कर होई. मात्र त्या रस्त्याच्या पूर्वेला, इंटरस्टेट ४०५च्या पुलाखाली, दोन्ही पदपथांवर बेघरांचे तंबू ठोकलेले बघायला मिळाले. त्यामुळे मी बुलेवार्डच्या पश्चिमेच्या म्हणजेच व्हेनिस बीचच्या बाजूच्या दिशेने चालत असे.

ती वस्ती बघून मला काही दशकांपूर्वी मुंबईतील सेनापती बापट मार्गावरील (पश्चिम रेल्वेच्या दादर व माटुंगा रोड स्थानकांदरम्यान) रेल्वे रुळांलगतच्या पदपथांवरील झोपडपट्ट्यांची आठवण झाली. नंतर काही वर्षांनी त्या उठवण्यात आल्या. तशीच स्थिती लॉस अँजेलिस शहरातील व्हेनिस बीचवरही काही महिन्यांपूर्वी होती. आता त्या बेघरांचे तंबू उठवण्यात आले, अशी बातमी माझ्या वाचनात आली. परंतु काही बेघर लोक इतके धीट झाले आहेत, की त्यांनी आपले तंबू चक्क सिटी-हॉलबाहेररच उभारले आहेत आणि आजही शहरात बऱ्याच पुलांखाली या बेघर लोकांनी आपले बस्तान बसवून राहिलेले बघायला मिळतील.

माझ्या लॉस अँजेलिस मधील वास्तव्यात, डिसेंबर २०२१ मध्ये एक बातमी वाचण्यात आली. ती म्हणजे शहराचे महापौर, एरीक गारसेटी ह्यांना अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बायडेन यांनी अमेरिकेचे भारतातील राजदूत (Ambassador) म्हणून नामांकित केले. पण अमेरिकन सेनेटमध्ये अद्याप चर्चा न झाल्याने त्यांची त्या पदावर नेमणूक अजून झाली नाही. परंतु त्यांच्या ह्या नामांकनाला काहींचा विरोध आहे. कारण त्यांना ह्या शहराचे दोन मुख्य प्रश्न- वाढती गुन्हेगारी व बेघरांची समस्या- आपल्या कारकिर्दीत सोडवता आले नाहीत. आता नोव्हे. २०२२ मध्ये शहराच्या महापौर पदावर डेमॉक्रॅटिक काँग्रेज वूमन केरन बेस निवडून आल्या.

लॉस अँजेलिस मधील बेघरांची संख्या वाढायला तीन प्रमुख कारणे, ती म्हणजे, व्यसनी आणि मानसिक रुग्णांची संख्या वाढणे तसेच इथल्या सम वातावरणामुळे (जास्त थंड किंवा जास्त गरम नाही) देशाच्या व कॅलिफोर्नियाच्या इतर भागातील बेघर लोकही इथे आकर्षित होताना आढळतात. राज्य सरकार व शहर यांच्या सहकार्याने बेघरांसाठी पक्की घरे बांधण्याचा कार्यक्रम चालू आहे. परंतु मागणी व पुरवठा ह्यांचा ताळमेळ अजून जुळत नाही. त्यामुळे कुठल्याही पक्षाचा महापौर निवडून आला तरी त्याच्या कारकिर्दीत, बेघरांचा प्रश्न तो सोडवू शकणार नाही असे वाटते!

तशीच स्थिती भारतातील मुंबई शहराची आहे. देशाची आर्थिक राजधानी असल्याने, इतर राज्यातील लोक आपल्या आर्थिक विकासासाठी मुंबईकडे आकर्षित होतात. परंतु मुंबई हे बेट असल्याने घरांसाठी जमिनीची कमतरता आहे. आणि ही बाब जाणवू लागली १९४७मधे झालेल्या फाळणीनंतर आलेल्या निर्वासितांच्या लोंढ्यामुळे! मुंबईत आपल्या घरासाठी जागा कशी मिळवावी ह्या बाबतची, जवळ जवळ ६० वर्षांपूर्वी वाचलेली एक गोष्ट मला आठवते. (आणि आजही ते लागू होते असा माझा अंदाज आहे!) त्यात लिहिले होते की, प्रथम तुम्ही रेल्वे, मध्यवर्ती किंवा राज्य सरकार, तसेच नगरपालिका ह्यापैकी एका जागेवर बेकायदेशीर झोपडी बांधायची. ह्या संस्था त्या झोपड्या हटवायला लागल्यावर, एखाद्या स्थानिक नेत्याबरोबर आंदोलनाला बसायचे. त्याच्या परिणामाने ती संस्था तुम्हाला त्याच भागात पर्यायी पक्की जागा देईल, तीसुद्धा फुकट किंवा माफक किमतीत! प्रत्येक निवडणुकीपूर्वी आधीच्या बेकायदेशीर झोपड्या कायदेशीर केल्या जातात. त्यामुळे झोपडी केव्हा उभारायची ह्याची काळजी करण्याचे कारण नाही !

अशाच एका सकाळी मी व्हेनिस बुलेवार्ड वरून फिरताना एक माणूस रस्त्यावरील कचरापिंपातून रिकाम्या बाटल्या तसेच कॅन, एका लांब काठीच्या साहाय्याने उचलून आपल्या जवळच्या प्लास्टिक पिशवीत टाकत होता. मी त्याला कुतूहलाने विचारले, 'तू असे का करत आहेस?' तेव्हा त्याने उत्तर दिले, 'मी एक बेकार व बेघर आहे. मला सरकारकडून फूड स्टँम्प्स मिळतात त्यामुळे उदरभरण होते, परंतु बिअर व सिगारेटसाठी लागणारे पैसे मी रिकाम्या बाटल्या व कॅन विकून मिळवतो.'

मग मी त्याला विचारले, 'तू मूळचा कुठला?'

तो म्हणाला, 'मी उत्तरेकडील सॅन फ्रान्सिस्को शहरातून आलेला आहे आणि पुढच्या आठवड्यात मला इथे पक्के घर मिळणार आहे.'

बोलण्यावरून मला तो सुसंस्कृत वाटला, म्हणून मी अधिक चौकशी करायला सुरुवात केली. तो पदवीधर होता. तो आपल्या पक्क्या घरात राहायला गेल्यावर, महिना खर्चासाठी (इलेक्ट्रिक, गॅस वगैरे) त्याला नोकरी करावी लागणार याची जाणीव होती, हे त्याच्या बोलण्यावरून दिसून आले. त्याच्या जवळ एक ट्रान्सिस्टर रेडिओ होता आणि त्यावरून जगात काय चालले आहे ह्याची त्याला माहिती मिळत होती. मी मूळचा भारतीय आहे हे त्याला समजल्यावर त्याने मला काश्मीरबद्दल प्रश्न विचारायला सुरुवात केली. मी त्याच्या प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न केला. ही गोष्ट 'दी काश्मीर फाइल्स' हा चित्रपट प्रकाशित होण्यापूर्वीची आहे; नाहीतर त्याला मी हा चित्रपट बघण्याचे सुचवले असते.

अन्न, वस्त्र, व निवारा ह्या मानवाच्या तीन मूलभूत गरज आहेत! आणि निवारा फक्त तात्पुरता नसावा अशी अपेक्षा धरणे चुकीचे नाही. विस्तृत पसरलेल्या लॉस अँजेलिस शहरातील पदपथावरील तंबूमधील बेघर असोत, किंवा मुंबई शहरात दाटीवाटीने उभारलेल्या झोपड्यातील रहिवासी असोत, दोघांच्याही अपेक्षा एकच- पक्के घर मिळविणे! आणि ती अपेक्षा पूर्ण झाल्यावर त्यावेळी साहजिकच त्यांच्या आनंदाला सीमा असणार नाहीत हे काही सांगायला नको.

टीप:- माझा हा लेख कुठल्याही संशोधनावर आधारित नसून माझ्या वैयक्तिक अनुभवावरून आणि परीक्षणांवरून लिहिलेला आहे, हे नमूद करावेसे वाटते.

***


चित्रयोग क्रिएटिव मेडिटेशन किट

chitrayog™
creative meditation

सहज सोप्या चित्रकलेतून मानसिक ताण कमी करण्यासाठी व मनःशांती मिळवण्यासाठी सर्व वयोगटांसाठी अत्यंत उपयुक्त साधन.



यात आहेत उत्तम दर्जाचे कोरे व छापील डिझाईन्स असलेले कागद. सर्वोत्कृष्ट पिग्मा पेन्स, रंगीत पेन्सिल्स व शार्पनर, प्रो सर्कल व रुलर. जोडीला ध्यानासाठी उपयुक्त शास्त्रीय संगीताचे दुवे. स्क्रीन टाइमपासून हवाहवासा ब्रेक मिळवून देणारे हे किट खरेदी करण्यासाठी संपर्क साधा:

chitrayog.usa@gmail.com
949 572 8649
www.chitrayog.in


## बृहन्महाराष्ट्र वृत्त- ऑनलाईन विभाग

**- पुरवणी विभाग:-**

https://bmmonline.org/vrutta-supplements/


- **कविता:-** बाल विभाग- फळांची शाळा पान क्र. १४- **कांचन गोडबोले** (क्लीव्हलँड)

**- राशिभविष्य:- डिसेंबर २०२२- दादा दामले** (न्यू जर्सी)

https://bmmonline.org/rashi-bhavishya/

## हृदयसूत्र

**- विनता कुलकर्णी** (शिकागो)



शरद ऋतूतील होता एक चिंतनशील दिवस
नजरेस पडले माझ्या छोटेसे पान लोभस

हृदयाकारी अन् रंगाने लालसर तांबुस छान
झाडाच्या फांदीला कसेबसे धरून होते पान

आसपासची सारी पाने गेली होती गळून
भवतालात शुष्क रितेपण होते भरून

सज्ज होते पान लौकरच खाली पडण्यांस
'भयभीत झालायंस का'?, विचारले मी त्यांस

त्यावर म्हणाले पान मला-
तय्यार आहे मी पुढील प्रवासाला

ऐक जरा माझ्या हृदयाचे सूत्र
अविरत सुखाचा सांगतो एक मंत्र

तरारलो मी संपूर्ण वसंत, ग्रीष्म ऋतूत
केली माझ्यापरीने वृक्षपोषणास मदत

माझा एक अंश म्हणजे हे पान
आणि माझेच एक रूप तो वृक्ष महान

अर्क माझा अगोदरच सामावलाय त्या झाडात
मातीकडे परततानाही लक्ष माझे मुळात

नाही करत मी परिस्थितीची खंत
शाखेपासून विभक्त होणे हा नसे अंत

मी जेव्हा तरंगत जमिनीकडे जाईन,
आनंदाने हात हलवून झाडाला सांगेन,
तुझ्यात आणि माझ्यात वाहते एकच 'जीवन'
लौकरच मी नव्या रूपात तुला पुन्हा भेटेन!

***

टीप:- व्हिएतनामी बौध्द धर्मप्रसारक, थिक नट हान [ऑक्टोबर ११, १९२६- जानेवारी २२, २०२२] यांच्या "Happy Continuation" विचारधारेवर आधारित.

# Being Rational

- **Ashish Mahabal** (Astrophysicist at the California Institute of Technology, Pasadena)



My wife- Anu and I visited Atlantic City from Aug. 11-14, 2022 for Bruhan Maharashtra Mandal's (BMM) convention as part of LA Abhivyakti's 'अंतरीच्या गूढगर्भी'- program team. I attend many conferences but not many social conventions. This was my 3rd BMM convention.

There were several good programs, and others have already written about it. Here I want to write about just one program that I thought could have been done better.

One morning BMM had arranged what they called विज्ञान दिंडी which can be loosely translated as a science procession. I missed breakfast on two days. This was the only day I made it to breakfast because as a scientist I wanted to be at the विज्ञान दिंडी. Alas, it was anything but.

The previous day they had some programs related to education and medicine, so I assumed that one of those guests would say a few words to flag things off. Instead, there was a short invocation to Ganesha. Since Maharashtrians like to appeal to the elephant god to remove obstacles, that could be pardoned. But then there was an invocation of his father. And this was followed by slogans of India. This was accompanied by dhol and lezim the decibel levels of which would have put Shankar Mahadevan's concert to shame. This too in the days when young children in India implore their parents not to buy them Diwali crackers so that noise pollution can be reduced.



I kept on looking for any minuscule presence of science in this science procession. I saw a drone, and I thought they would explain something about drones, maybe even the Mars helicopter, a recent Jet Propulsion Laboratory/NASA achievement. But it was only for photography. The procession of the non-science gathering continued.




At one point two women wearing nine-yard sarees suddenly started playing fugdi, and I thought maybe one of them would let go of the other and demonstrate centripetal force. But they just got tired and stopped.

The only sign of science was some placards bearing stock photographs of nurses and doctors and words like 'Thank you frontline heroes'. Poor patrons holding those up also likely did not know that that was it.

Surely the tech-savvy Marathi diaspora in the US can do better. There are so many Marathi scientists in the US. Get one of them to flag things off. Have posters of real science that has been done. In fact, a few such posters about achievements could be hung throughout the BMM and could be an inspiration to all the students and the next generation of Marathis in the US. We need to maintain our culture but also raise a rational generation. That is the only hope in a fractured society: A generation that can ask questions and be satisfied only with the truth.

Perhaps what is needed is to bring together more rational thinkers during these conventions. Surely there are many. At the next convention that is at the tech-home of the US, the Bay Area, let us have a few science and tech programs, which also fits in with the rich intellectual culture of India. Including a real science procession.

***

Greetings ! 🙏

**Charity giving to any entity in India is now easy**
**with Foundation for Small Charities India, Inc. (FSCI)**
**Granted by IRS A (501 (C)(3) Tax Exempt Status.**

**You get a tax deduction and do not pay any commission.**
**You instruct and send, we deliver.**
**An affiliate 'Foundation for Small Charity' (FSC) has the 80-G**
**and FCRA required Registration in India,**
**allowing you to give at will, without any red tape.**
**India recipients of your giving need not be a registered charity.**
**Your school or college never attempted to obtain tax exemption in India, which is very expensive. They do not even need tax exemption (80-G,FCRA).**
**FSC is the answer. For more detail. Visit our Website**
**"WWW.SmallCharity.Org" Or**
**Email to Admin@SmallCharity.Org**
**You will hear from:**
**Ramesh Sarva, CPA, 183 S. Broadway,#210, Hicksville NY 11801**
**Join Donor List**

JAGDISH & SHUBHANGI THAKUR
RAVI & NILIMA BHIRUD
RAHUL & PUNAM MUTHA
KOTESWARA RAO KUNDA,MD
KIRAN & NANDINI JOAG
KISHOR DANDEKAR
SUBHASH & VASANTI PURANIK
SUHASINI JOSHI
KAMLAKAR & ARUNA PENDSE
PRAMILA SARVA
VIJAY NARINGREKAR
MUKUND & SHAILA DIDOLKAR
KASI & GEETHA GABBITA
RAJESH & SUMANA RAO
RAMESH GAONKAR
CHANDRA VARIA
NATWARLAL & KALI RAMANI
BHANJI & MANSI KUNDARIA
JITU & KOKILA PADALIA
DALSUKH & ILA MADIA
HIMAT & MINA TANK
MUKESH & VIBHA SHAH
SUMANT SNEHALATA PANDYA
MOHAN & RAMA PATEL
JAYENDRA & SAROJ SHAH
GOVIND & BHAKTI NADKARNI

SWAROOP YOG & OTHER CHARITIES
MAHARSHI KARVE FOUNDATION 16 NEW GIRLS EDU
ANAND RISHI Hosp. CT SCAN AHMADNAGAR MH
EDUCATIONAL FOUNDATION, A.P.
V.T. PATIL FOUNDATION
AMPTE FOUNDATIO
CASP, V.S.SAMITI, PUNE,PATHAK TRUST
COSMIC BEATS
ATHASHREE
ADHAR
EDUCTION
AKKA DHOPESHWAR MAHILA MANDAL
NIH
SAFETY CLUB, HYDERABAD, A.P.
G.D.TRUST
FUJI MAMMOGRAPHY-M P SHAH MEDICAL
COLLEGE, JAMNAGAR, GUJARAT
M P SHAH MEDICAL COLLEGE
MAMMOGRAPHY EQUIPMENT
GIVING 200 TESTS A WEEK (10,400 A YEAR)
FOR WOMEN TOWARDS EARLY DETECTION AND
INTERVENTION WHICH IS NOT AVAILABLE IN
NEARBY HOSPITALS
M P SHAH MEDICAL COLLEGE SCHOLARSHIPS
M P SHAH MEDICAL COLLEGE SCHOLARSHIPS
SHANTA DURGA TEMPLE, KAVLEM, GOA

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

॥ मराठी तितुका मेळवावा ॥

**Subscription Remittance Address:**
**BMM Newsletter**
**20611 Whitebud CT.**
**Tampa FL 33647**

BMM
बृहन्महाराष्ट्र मंडळ



**नाते जुळते मनाशी मनाचे**




## Reshimgathee

**A BMM Matrimonial Initiative for Maharashtrians in North America**

https://reshimgathee.bmmonline.org/




Five-level "Marathi Language Learning"
progressive curriculum,
study guidelines, and
supporting materials
the BMM-Bharati Vidyapeeth's
joint certificates for
"Marathi Bhasha" examinations
after successful completion of
each level and passing criteria.
For BMM Marathi Shala Inquiries,
Email:- contact.bmmshala@gmail.com
https://bmmshala.net/

# बृहन्महाराष्ट्र वृत्त - पुरवणी

## डिसेंबर, २०२२

**-(बृ. म. मंडळाच्या संकेतस्थळावर)-**

**https://bmmonline.org/vrutta-supplements/**

# फळांची शाळा

- **कांचन  गोडबोले** (क्लीव्हलँड, ओहायो)



ही कविता 'बाल दिना'च्या (१४ नोव्हेंबर, २०२२) निमित्ताने सर्व मराठी मुलामुलींना समर्पित केली आहे.       -कांचन गोडबोले

अ म्हणतो 'अननस', अ म्हणतो अननस,
पहिल्या अक्षरात आहे 'पाईनॅपल'चा रस!

'आंबा' म्हणजे 'मँगो', आहे फळांचा राजा,
वर्षभर जातो आपल्या शेतीच्या कामकाजा,
मे महिन्यात घेतो मस्त उन्हाळ्याची सुट्टी,
म्हणतो,  "आलो आता, चला खा आमरसाची वाटी"!

'कॅल्शिअम' ने बनले हे 'बनाना' म्हणजे पिवळं पिवळं 'केळं',
सकाळ असो वा संध्याकाळ, खाण्यासाठी चालते कुठलीही वेळ!

'कलिंगड', 'कलिंगड', वजनाने आहे जड, कधी मिळते मोठे,
कधी मिळते लहान, 'वॉटरमेलन ' भागवते, भूक आणि तहान!

'गरे' खा 'गरे'  पोटाला बरे, 'गरे' खा' गरे'  पोटाला बरे,
फ 'फणसातला', 'जॅकफ्रुट' मध्ये असतात ते खरें!

च ’चिक्कू’तला म्हणजे 'सैपोडिला', असतो कसा गोड़,
आणखी एक 'चिक्कू' खाऊया, पुरत नाही एक फोड!

'पेरू' म्हणजे 'ग्वावा'-  नाही बरं 'पेअर',
मीठ लावून फोडी,  करूया शेअर!

रोज खा एखादे 'मोसंब' किंवा 'ऑरेन्ज ऑरेन्ज' संत्र',
चष्म्याशिवाय डोळ्यांना दिसू लागेल, छान स्पष्ट चित्र!

जेव्हा मिळते 'पपया' म्हणजे 'पपई',
अनेक 'व्हिटॅमिन्स'ची होते भरपाई!

'ॲपल ॲपल' 'सफरचंद' कधी मिळते हिरवे, तर कधी मिळते लाल,
एक फोड जरी खाल्ली रोज, की मग होतात लाल लाल गाल!

'स्ट्रॉबेरी, चेरी, ब्लॅकबेरी, ब्ल्यूबेरी' आहे ह्यांची दोस्ती,
त्यांच्याशी मैत्री करून, आपल्याही मिळते खूप शक्ती!

तर अशी ही भरली, गोड गोड फळांची, स्वीट स्वीट शाळा,
फ फळातला आणि फ ’फ्रुट्स’च्या नावांनी भरून गेला फळा!
***